## दिनांक १२.१२.२००८ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र / जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक १२.१२.२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र / जिल्हा सल्लागार समितीची सभा संपन्न झाली. सभेस हजर असलेल्या अधिकारी / पदाधिका-यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्व उपस्थित अधिकारी व पदाधिकारी यांचे स्वागत केले व दिनांक २९.०२.२००८ रोजी संपन्न झ ालेल्या सभेचे इतिवृत्त चर्चेअंती मंजूर करण्यांत आले. त्यावरील कार्यवाहीच्या मुद्यांवर तसेच नविन मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | औद्योगिक संघटनेचे नांव | विषय | चर्चा / निर्णय | संबंधित कार्यालय |
|---|---|---|---|---|
| १ | मसिआ, औरंगाबाद | वाळूज एम.आय.डि.सी. ते पैठण (लिंक रोड) रोडला जोडणारा पाईप लाईन रोडबाबत | वाळूज एम.आय.डि.सी. ते पैठण (लिंक रोड) रोडचे काम पुर्ण करण्यांत आल्याचे कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग यांनी सांगितले परंतु सदर रस्त्यावर प्रमाणापेक्षा जास्त वाहतूक असल्यामुळे रस्ता खराब झालेला आहे, याबाबत मा. अध्यक्षांनी रस्त्यावरील खड्डे परत बुजवून घेवून रस्ता वाहतूकीसाठी योग्य होईल असे सांगितले. | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग |
| २ | मसिआ, औरंगाबाद | औरंगाबाद ते पैठण रोडच्या कामाबाबत | औरंगाबाद ते बिडकिण पर्यंतचे काम पुर्ण झाल्याचे कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग यांनी सांगितले व बिडकिण ते पैठण या रस्त्याच्या कामाबाबत बी.ओ.टी. तत्वावर टेंडर काढण्यात आलेले असुन अजूनपर्यंत टेंडर कोणीही भरलेले नाही. याबाबत पुन्हा टेंडर मागवावे असे ठरले. | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग |
| ३ | मसिआ, औरंगाबाद | नगर नाका ते एम.आय.डि.सी. वाळूज पर्यंत स्ट्रीट लाईट सुरु करणेबाबत | याबाबत सविस्तर चर्चा होवून मा. प्रशासक, सिडको यांनी सदर रस्त्यावरील स्ट्रीट लाईट बाबत पहाणी करुन अहवाल द्यावा असे ठरले. | प्रशासक, सिडको / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी), MIDC |
| ४ | मसिआ, औरंगाबाद | विस्तारीकरणा अंतर्गत एम.आय.डि.सी. वाळूज मधील भूखंड वाटपाबाबत | सदर बाब धोरणात्मक असल्याचे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले, यावर अध्यक्षांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.आय.डि.सी., मुंबई यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे सांगितले | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | एम.आय.डि.सी. शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रतील फूड पार्कमधील भूखंड दि १२.०६.२००७ च्या पुर्वीच्या जुन्या दराने देण्यात यावेत व रिकामे भूखंड त्वरीत वाटप करण्यांत यावेत | भूखंडाचे दर ही धोरणात्मक बाब असल्याचे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. याबाबत औद्योगिक संघटनेच्या पदाधिका-यांनी फूड पार्कच्या नियोजित जागेजवळ मे. गॅब्स इंडिया पॉवर लि. यांचा कॅप्टीव्ह जनरेशन पॉवर प्लॅंट असल्यामुळे वायू प्रदूषण होण्याची शक्यता आहे. यावर मा. अध्यक्षांनी अन्न व औषध प्रशासन, प्रदूषण नियंत्रण मंडळ, संघटनेचे पदाधिकारी व जिल्हा उद्योग केंद्र यांनी संयुक्तपणे शेंद्रा फूड पार्क जागेस भेट देवून अहवाल द्यावा असे ठरले. | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. |
| ६ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | भूखंड ट्रान्सफर करतांना कामगार खात्याकडून मिळणा-या ना हरकत प्रमाणपत्राबाबत | भूखंड ट्रान्सफर करताना ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव कामगार खात्याच्या मुख्यालयास सादर केला जातो असे संबंधित अधिका-यांनी सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी सदर ना हरकत प्रमाणपत्र स्थानिक पातळीवर देण्याबाबत मा. अध्यक्षांच्या सहीने पत्र पाठविण्याचे ठरले. | कामगार उप-आयुक्त, औरंगाबाद |
| ७ | CMIA, औरंगाबाद | एम.आय.डि.सी. चिकलठाणा मधील आय.टी. पार्कबाबत | एम.आय.डि.सी. चिकलठाणा येथील आय.टी. पार्कला कार्यकारी अभियंता, एम.आय. डि.सी. / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) यांनी भेट दिल्याचे सांगितले व अतिरिक्त जनरेटर सेट लावण्यात येईल, असे सांगितले तसेच आय.टी. पार्क मध्ये जे भूखंड वाटप करण्यांत आले आहेत व त्यावर ज्या इमारती बांधण्यात आलेल्या आहेत, त्या आय.टी. पार्कसाठी योग्य आहेत किंवा कसे याचा १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. | कार्यकारी अभियंता, एम.आय. डि.सी. / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) |
| ८ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | एम.आय.डि.सी. चिकलठाणा / वाळूज मधील उद्योग घटकाकडून ESIC फीस घेते परंतु कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना मेडीकल सेवा मिळत नाही व कार्ड वाटप केलेले नसल्याबाबत | एम.आय.डि.सी. चिकलठाणा मधील ESIC हॉस्पीटलला भेट दिल्याचे महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी सांगितले तसेच कामगारांना पुर्ण कार्ड वाटप झाल्याचे संबंधित अधिका-यांनी सांगितले. एम.आय.डि.सी. वाळूज मध्ये एक डिस्पेन्सरी असुन तिथे डॉक्टरांची फक्त दोन पदे मंजूर असल्याचे व कामगारांना मेडीकल सेवा उपलब्ध करुन दिली असल्याचे ESIC अधिका-यांनी सांगितले. | ESIC हॉस्पीटल |
| ९ | मसिआ, औरंगाबाद | एम.आय.डि.सी. वाळूज मध्ये स्टॅंगरीन डे च्या दिवशी रात्री रस्त्यावरील दिवे सुरु ठेवणेबाबत | एम.आय.डि.सी. वाळूजमध्ये गुरुवार व शुक्रवार या दोन दिवशी रात्री रस्त्यावरील दिवे बंद असल्यामुळे चो-यांचे प्रमाण वाढल्याचे औद्योगिक संघटनांच्या पदाधिका-यांनी निदर्शनास आणुन दिले असता एम.आय.डि.सी. मार्फत दोन पोलच्या मध्ये सौर उर्जेवर चालणारे दिवे लावता येतील किंवा कसे, याबाबत एम.आय.डि.सी.ने अहवाल सादर करावा, असे अध्यक्षांनी सुंचविले. | कार्यकारी अभियंता, एम.आय. डि.सी. / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | CMIA, औरंगाबाद | एम.आय.डि.सी. मार्फत वाळूज व शेंद्रा औद्योगिक क्षेत्रामध्ये कॅप्टीव्ह पॉवर जनरेशन प्लँट सुरु करणेबाबत | सदर मुद्यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, वाळूज मधील सर्व कंपन्यानी एकत्र येवून वाळूज क्षेत्रा एवढी वीज निर्मिती प्रकल्प उभा करता येईल किंवा कसे, याबाबतचा अहवाल एम.आय.डि.सी. कार्यालयाने सादर करावा. | कार्यकारी अभियंता, एम.आय. डि.सी. / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) |
| ११ | CMIA, औरंगाबाद | एम.आय.डि.सी. मार्फत औरंगाबाद येथे आय.टी. सेक्टर व उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर सुरु करणेबाबत | कन्व्हेन्शन सेंटरसाठी जागा निश्चित करुन त्यावर कन्व्हेन्शन सेंटर बांधता येईल. सद्य:स्थितीत चिकलठाणा, शेंद्रा येथील औद्योगिक क्षेत्रात जागा उपलब्ध नाी, तथापि, माहिती तंत्रज्ञान पार्कसाठी केंब्रीज ते हर्सूल सावंगी वळण रस्त्यालगत जमिनीचे भूसंपादन झाल्यास आय.सी.सी करता येईल असे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. |
| १२ | CMIA, औरंगाबाद | मराठवाडयामध्ये येवू घातलेलया नविन मध्यम व मोठया उद्योग घटकांना सर्व प्रशासकिय मान्यता मिळण्यासाठी Single Window Clearance System सुरु करणेबाबत | Single Window Clearance System सुरु करणे बबत लवकरच निर्देश जारी होणार आहेत, असे अवगत केले. | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र |
| १३ | वैजापूर तालुका इंडस्ट्रीज असोसिएशन | एम.आय.डि.सी. वैजापूर औद्योगिक क्षेत्रात प्लॉट डि-मार्केशन करणे, रस्ते, पाणी व वीज उपलब्ध करणे ई. कामे त्वरीत सुरु करावत तसेच अर्जदार उद्योजकांना मा. उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच हस्ते प्लॉट वाटप करण्यांत आले होते, त्यांना प्लॉटचा ताबा ताडतोब द्यावा व भूखंडासाठी अर्ज केलेल्या उद्योजकांना ताबडतोब भूखंड वाटप करावेत व या क्षेत्रात उद्योग सुरु व्हावेत, साठी प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांना तात्काळ सूचित करावे | याबाबत सविस्तर चर्चा करण्यांत आल्यावर मा. अध्यक्षांनी असे सुचविले की, एम.आय.डि.सी. ने प्लॉटचा ताबा त्वरीत द्यावा व पुर्ण ले-आऊट तयार करुन प्लॉटचे रेखांकन करावे व पुढील कार्यवाही त्वरीत करावी. सदर कामास पोलिसांचे संपूर्ण् संरक्षण देण्याबाबत कार्यवाही करण्यांत असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. व पोलिस अधिक्षक (ग्रामीण) |
| १४ | मसिआ, औरंगाबाद | इलेक्ट्रीसिटी डयूटी एक्झम्शन अधिसूचनेचे महावितरण मार्फत पालन होणेबाबत यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे औरंगाबादइ येथील स्थानिक अधिकारी इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर चे प्रमाणपत्र मागतात, याबात शासन निर्णयाची प्रत त्यांना देवूनही परिस्थिती तशीच आहे | शासन निर्णयानुसार इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टरच्या प्रमाणपत्राची आवश्यकता नाही व याबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीने सदर बाब तपासून अहवाल सादर करावा, असे मा. अध्यक्षांनी सांगितले. | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर, औरंगाबाद |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | मसिआ, औरंगाबाद | चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात रस्ते, वीज व ड्रेनेजची सुविधा पुरविणेबाबत | सद्य:स्थितीत सदर औद्योगिक क्षेत्र महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्याचे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी महानगरपालिकेशी याबाबत सविस्तर चर्चा करुन प्रश्न सोडविण्यात येईल असे ठरले. | आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद |

शेवटी महाव्यवस्थापक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, औरंगाबाद

स्वाक्षरीत
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद

दिनांक ०३.०६.२००९ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र / जिल्हा सल्लागार समिती सभेचे इतिवृत्त

दिनांक ०३.०६.२००९ रोजी सकाळी १२.०० वाजता मा. श्री. संजीव जयस्वाल (भा.प्र.से.), जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा संपन्न झाली. सभेस हजर असलेल्या अधिकारी / पदाधिका-यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद यांनी सर्व उपस्थित अधिकारी व पदाधिकारी यांचे स्वागत केले व दिनांक १२.१२.२००८ रोजी संपन्न झालेल्या सभेचे इतिवृत्त चर्चेअंती मंजूर करण्यांत आले. त्यावरील कार्यवाहीच्या मुद्यांवर तसेच नविन मुद्यांवर खालीलप्रमाणे चर्चा होवून निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | औद्योगिक संघटनेचे नांव | संबंधित कार्यालय | विषय | मागील सभेतील चर्चा / निर्णय |
|---|---|---|---|---|
| १ | मसिआ, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग | वाळूज एम.आय. डि.सी. ते पैठण (लिंक रोड) रोडला जोडणारा पाईप लाईन रोडबाबत | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग यानी सदर रोडवरील खड्डे बुजवून घेण्यात आले होते व सदर रस्त्यावर वाहतूक नियममित चालू आहे. परंतु सदर रस्त्यावर जास्त वाहतूक असल्यामुळे परत रस्त्यावर खड्डे पडलेले आहेत व रस्ता दुरुस्तीचे काम चालू असून ते त्वरीत पुर्ण करण्यांत येईल असे सांगितले. |
| २ | मसिआ, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग | औरंगाबाद ते पैठण रोडच्या कामाबाबत | औरंगाबाद ते बिडकिण रत्याचे काम पुर्ण झाले असुन पुढील कामासाठी बी.ओ.टी. तत्वावर टेंडर काढण्यात आले होते परंतु टेंडर कोणीही भरलेले नसल्यामुळे पुन्हा टेंडर मागविण्यात ओले आहे असे कार्यकारी अभियता, सा.बां. विभाग यांन सांगितले. |
| ३ | मसिआ, औरंगाबाद | प्रशासक, सिडको / कार्यकारी अभियंता (वीज व पाणी), MIDC | नगर नाका ते एम.आय.डि.सी. वाळूज पर्यंत स्ट्रीट लाईट सुरु करणेबाबत | याबाबत सविस्तर चर्चा होवून मा. अध्यक्षांाी सदर काम सिडको मार्फत हाती घेण्यात यावे, असे सांगितले. |
| ४ | मसिआ, औरंगाबाद | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. औरंगाबाद | विस्तारीकरणा अंतर्गत एम.आय.डि.सी. वाळूज मधील भूखंड वाटपाबाबत | वाळूज येथे अतिरिक्त १२५ एकर जमीन संपादित करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला असल्याचे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले, यावर पुढील १५ दिवसात SDO यांचेशी चर्चा करुन शेकापूर-करोडी या भागातील गायरान जमीन घेता येईल किंवा कसे याबाबत शहानिशा करुन निर्णय घेण्याचे ठरले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. औरंगाबाद | एम.आय.डि.सी.शेंद्रा पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रतील फूड पार्कमधील भूखंड दि १२.०६.२००७ च्या पुर्वीच्या जुन्या दराने देण्यात यावेत व रिकामे भूखंड त्वरीत वाटप करण्यांत यावेत | मागील सभेत ठरल्यानुसार समितीने सदर जागेची पहाणी केली व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या दिनांक ४.३.२००९ रोजीच्या पत्रान्वये प्रदूषण करणा-या कारखान्याचे उत्पादन पुर्ण क्षमतेने चालू झाल्यावर संपूर्ण वर्षभर निरीक्षण घेणे आवश्यक आहे, असा अहवाल मुख्यालयास सादर केल्याचे प्रादेशिक अधिकारी एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. फूड पार्क सुरु झाल्यानंतर प्रदूषण झाल्यास उद्योग घटकाचे नुकसान होवू शकते, या संदर्भात आय.आय.टी. पवई यांचेकडून अहवाल मागविण्यात यावा, अशी औद्योगिक संघटनेच्या प्रतिनिधीने मागणी केली, त्यावर मा. अध्यक्षांनी असे सांगितले की, महराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्यांच्या नॉर्म्स प्रमाणे अहवाल द्यावा व सदर उद्योग घटकांना दुसरीकडे जागा देता येईल किंवा कसे, याबाबत प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी निर्णय घ्यावा. |
| ६ | CMIA, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) | एम.आय.डि.सी. चिकलठाणा मधील आय.टी. पार्कबाबत | सदर कामाकरिता सन २००९-१० मध्ये अर्थसंकल्पात तरतूद केली आहे तसेच प्रशासकिय मान्यतेसाठी प्रस्ताव लवकरच पाठविण्यात येत आहे व सदर काम एक महिन्यात पुर्ण होईल, असे सांगितले. |
| ७ | मसिआ, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) | एम.आय.डि.सी. वाळूज मध्ये स्टॅगरींग डे च्या दिवशी रात्री रस्त्यावरील दिवे सुरु ठेवणेबाबत | एम.आय.डि.सी. मार्फत दोन पोलच्या मध्ये सौर उर्जेवर चालणारे दिव लावण्याबाबत चर्चा झाली १० कि. वॅट क्षमतेचा पायलट प्रोजेक्ट हाती घ्यावा अस मा. अध्यक्षांनी सांगितले. |
| ८ | CMIA, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) | एम.आय.डि.सी. मार्फत वाळूज व शेंद्रा औद्योगिक क्षेत्रामध्ये कॅप्टीव्ह पॉवर जनरेशन प्लँट सुरु करणेबाबत | यावर सविस्तर चर्चा होवून औद्योगिक संघटनांकडे याबाबत संमती साठी विचारणा केलेली आहे. |
| ९ | CMIA, औरंगाबाद | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. | एम.आय.डि.सी. मार्फत औरंगाबाद येथे आय.टी. सेक्टर व उद्योग क्षेत्राच्या वाढीसाठी इंटरनॅशनल कन्व्हेन्शन सेंटर सुरु करणेबाबत | सद्यःस्थितीत चिकलठाणा, शेंद्रा येथील औद्योगिक क्षेत्रात जागा उपलब्ध नाही, तथापि, माहिती तंत्रज्ञान पार्कसाठी केंब्रीज ते हर्सूल सांवगी रस्त्यावर जमीनीचे भूसंपादन झाल्यास इंटरनॅशनल कन्व्हेशंन सेंटर सुरु करता येईल असे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. |
| १० | वैजापूर तालुका इंडस्ट्रीज असोसिएशन | प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. | एम.आय.डि.सी. वैजापूर औद्योगिक क्षेत्रात प्लॉट डि-मार्केशन करणे, रस्ते, पाणी व वीज उपलब्ध करणे ई. कामे त्वरीत सुरु करणेबाबत | एम.आय.डि.सी. वैजापूर औद्योगिक क्षेत्रात प्लॉट डि-मार्केशन करणे, रस्ते, पाणी व वीज उपलब्ध करणे ई. कामे त्वरीत सुरु करण्यासाठी दिनांक १८.०६.२००९ रोजी प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी पोलिस बंदोबस्तासह कार्यवाही करावी. पोलिस बंदोबस्तासाठी पोलिस आयुक्त यांना पत्र देवून विनती करण्यांत यावी व भूखंड वाटपाचे काम त्वरीत पूर्ण करावे, असे मा. अध्यक्षानी सांगितले. |
| ११ | मसिआ, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता (वीज व पाणी) | चिकलठाणा औद्योगिक क्षेत्रात रस्ते, वीज व ड्रेनेजची सुविधा पुरविणेबाबत | याबाबत महापौर व आयुक्त यांचे समवेत स्वतंत्र सभा आयोजित करण्यांत येणार असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | कामगार उप-आयुक्त, औरंगाबाद | भूखंड ट्रान्सफर करतांना कामगार खात्याकडून मिळणा-या ना हरकत प्रमाणपत्राबाबत | भूखंड ट्रान्सफर करताना ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव कामगार खात्याच्या मुख्यालयास सादर केला जातो असे संबंधित अधिका-यांनी सांगितले. यावर मा. अध्यक्षांनी ५० पेक्षा कमी कामगार असलेल्या घटकांना ना हरकत प्रमाणपत्र स्थानिक पातळीवर देण्याबाबत प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचित केले. |
| १३ | वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | ESIC Hospital | एम.आय.डि.सी. चिकलठाणा / वाळूज मधील उद्योग घटकाकडून **ESIC** फीस घेते परंतु कामगारांना व त्यांच्या कुटूंबियांना मेडीकल सेवा मिळत नाही व कार्ड वाटप केलेले नसल्याबाबत | ESIC हॉस्पीटल मार्फत मेडीकल सेवा उपलब्ध होत असल्यामुळे सदर मुद्दा वगळण्यात यावा से ठरले. |
| १४ | CMIA, औरंगाबाद | जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद | मराठवाडयामध्ये येवू धातलेलया नविन मध्यम व मोठया उद्योग घटकांना सर्व प्रशासकिय मान्यता मिळण्यासाठी Single Window Clearance System सुरु करणेबाबत | धोरणात्मक बाब |
| १५ | मसिआ, औरंगाबाद | कार्यकारी अभियंता, एम.एस.ई.डी.सी. लि., औरंगाबाद | इलेक्ट्रीसिटी डयूटी एक्झम्शन अधिसूचनेचे महावितरण मार्फत पालन होणेबाबत यासाठी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे औरंगाबादइ येथील स्थानिक अधिकारी इलेक्ट्रीकल इन्स्पेक्टर चे प्रमाणपत्र मागतात, याबात शासन निर्णयाची प्रत त्यांना देवूनही परिस्थिती तशीच आहे | इलेक्ट्रीसिटी डयूटी एक्झम्शन अधिसूचनेनुसार कार्यवाही करण्यांत यावी असे मा. अध्यक्षांनी सांगितले. |
| १६ | मसिआ, औरंगाबाद | जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद | जिल्हा उद्योग मित्र समिती सभा नियमित घेणेबाबत | यापुढे जिल्हा उद्योग मित्र समिती सभा नियमित घेणबाबत मा. अध्यक्षांनी महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र यांना सूचित केले. |
| | | | साप्रोयो-२००७ अंतर्गत औरंगाबाद तालुका डि+ झोन करणेबाबत | सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ अंतर्गत औरंगाबाद तालुका सद्य:स्थितीत D झोनमध्ये आहे, परंतु एम.आय.डि.सी. कार्यालयामार्फत सदर तालुका C झोन समजून कार्यवाही केली जाते. याबाबत मा. अध्यक्षांनी एम.आय.डि.सी. ने सदर तालुका D झोनमध्ये समाविष्ट करण्याबाबत त्यांच्या मुख्यालयास प्रस्ताव पाठवावा असे सूचित केले. |
| | | | साप्रोयो-२००७ अंतर्गत शासन निर्णयामधील परिच्छेद ३.४ , ३.६, ३.७, ४.४, ५.१ व ५.४ मध्ये बदल करणेबाबत | सदर बाब धोरणात्मक असुन सामुहिक प्रोत्साहन योजना २००७ अंतर्गत परिच्छेद ३.४ , ३.६, ३.७, ४.४, ५.१ व ५.४ मध्ये बदल करणेबाबत उद्योग संचालनालयामार्फत शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, असे महाव्यवस्थापक यांनी सांगितले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | मसिआ, औरंगाबाद | एम.एस.ई.डी.सी. लि. | शासन निर्णय क्र. पीएसआय-२१०९/१४/उद्योग-८, दिनांक ८.३.२००९ नुसार इलेक्ट्रीसीटी डयूटी माफी मिळणेबाबत | याबाबत महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी लि. यांनी नियमानुसार कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सांगितले. |
| | | | एच.टी.बील धारकांना बील भरणेसाठी चिकलठाणा, शेंद्रा व वाळूज येथे सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत | एच.टी.बील धारकांना बील भरणेसाठी चिकलठाणा, शेंद्रा व वाळूज येथे सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी, असे मा. अध्यक्षानी सांगितले. |
| | | | एम.आय.डि.सी. शेंद्रा येथे विद्युत पुरवठयासाठी मुलभूत सोई पुरविणेबाबत | एम.आय.डि.सी. शेंद्रामधील सी व डी सेक्टरमध्ये लाईट उपलब्ध करुन देण्यात आली असुन ए सेक्टरमध्ये एम.एस.ई.डी.सी. इन्फ्रास्ट्रक्चर उभारुन देण्यात तयार आहे असे संबंधित अधिका-यांनी सांगितले व सदर काम एक महिन्यात पुर्ण करुन तसा अहवाल सादर करावा असे मा. अध्यक्षांनी सूचित केले. |
| १८ | मसिआ, औरंगाबाद | एम.एस.आर.डी.सी. व सा.बां. विभाग | १. गोलवाडी ते जुना नगर नाका चौपदरी रोड करणेबाबत<br>२. वाळूज ते चित्तेगांव जोड रस्त्याबाबत<br>३. गोलवाडी ते पैठण रोडबाबत | सदर कामे सुरु करण्यांत येत असल्याचे संबंधित अधिका-यांनी सभागृहास सांगितले. |
| १९ | मसिआ, औरंगाबाद / वाळूज इंडस्ट्रीज असोसिएशन | एम.आय.डि.सी. | १. विस्तारीकरणा अंतर्गत एम.आय.डि.सी. मधील भूखंड वाटपाबाबत<br>२ भूखंड वाटपाबाबत स्थानिक पातळीवर सभा घेण्याबाबत<br>३ एम.आय.डि.सी. चिकलठाणा व वाळूज मधील रोड दुरुस्तीबाबत<br>४ सर्व एम.आय.डि.सी. मध्ये ग्रीन झोन करणेबाबत<br>५ एम.आय.डि.सी. शेंद्रामध्ये घटक सुरु करणेसाठी कालावधी वाढवून देणेबाबत<br>६ एम.आय.डि.सी. चिकलठाणा व वाळूज क्षेत्रास इंडस्ट्रीयल टाऊनशिपचा दर्जा देणेबाबत.<br>७. एम.आय.डि.सी. वाळूज परिसरात अनियमित आणि कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याबाबत तसेच रस्ते दुरुस्तीबाबत | वरिल सर्व मुद्यावर सविस्तर चर्चा होवून एम.आय.डि.सी. ने योग्य ती कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांनी सुचविले. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | मसिआ, औरंगाबाद | पोलिस आयुक्त, औरंगाबाद | एम.आय.डि.सी. शेंद्रा येथे स्वतंत्र पोलिस चौकी उभारण्याबाबत | एम.आय.डि.सी. शेंद्रा येथे पोलिस चौकीसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी, एम.आय.डि.सी. यांनी सांगितले. |
| २१ | -- | जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद | सन २००८ च्या जिल्हा पुरस्कार विजेत्या घटकांना मान्यता देणेबाबत | दिनांक ३०.०३.२००९ रोजी जिल्हा पुरस्कार निवड उप-समितीची सभा झाली. सदर सभेत सन २००८ च्या जिल्हा पुरस्कारासाठी निवड करणेसाठी खालीलप्रमाणे शिफारस करण्यांत आली आहे.<br>प्रथम पुरस्कार : **मे. ए.एस.आर. इंडस्ट्रीज,** प्लॉट नं. एम-६१, एम.आय.डि.सी. एरिया,वाळूज, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद<br>द्वितीय पुरस्कार (विभागून) : **मे. अभ्यूत इंजिनिअरींग प्रा.लि.,** प्लॉट नं. के-२१८/१, एम.आय.डि.सी., एरिया, वाळूज, ता. गंगापूर, जिल्हा-औरंगाबाद<br>द्वितीय पुरस्कार: विभागून **मे. संकज ब्राईट वायर प्रा.लि.** प्लॉट नं. के-२४२, एम.आय.डि.सी. एरिया, वाळूज, ता. गंगापूर, जिल्हा-औरंगाबाद<br>सदर पुरस्कार विजेत्या घटकांना सभेमध्ये मान्यता देण्यात आली. |

शेवटी महाव्यवस्थापक यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

स्वाक्षरीत
मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा उद्योग मित्र समिती, औरंगाबाद

स्वाक्षरीत
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, औरंगाबाद